# भाग १

## प्रकरण पहिले

## "ग्रामीण कथेचे स्वरूप: सामान्य विवेचन"

भाग १

## : प्रकरण पहिले :

### ग्रामीण कथेचे स्वरूप: सामान्य विवेचन

रा. रं. बोराडे यांच्या कथेतील समाजचित्रणाचा अभ्यास करताना प्रथमत: ग्रामीण कथेचा प्रवास, तिचा विकास व एकंदर स्वरूप पाहणे अगत्याचे ठरते.

साधारणपणे १९२५ पासून मराठीत ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागली. जाणीवपूर्वक ग्रामीण परिसरातील माणसांचे दर्शन घडविण्याचे कार्य मात्र १९५२ पासूनच सुरु होते. तिथपासून आजपर्यंत चाळीस पंचेचाळीस वर्षांमध्ये हा प्रवाह समृध्द झालेला आपणाला दिसतो. वाङ्मयीन वातावरण बदलले. नवकथेचा परिणाम म्हणून जीवनाचे वास्तव चित्र रेखाटावे ही जाणीव लेखकात प्रबळ झाली. शिक्षणाचा प्रसार अधिक होऊ लागला. पूर्वी लेखकाचा वर्ग शहरातून होता. आता खेड्यातून आलेला शिक्षित तरुण लिहू लागला. परिणामत: ग्रामीण जीवनाचे वास्तव व म्हणूनच अधिक कलात्मक चित्रण होऊ लागले. अशा लेखकांमध्ये व्यंकटेश माडगूळकर अग्रणी होते.

### ग्रामीण संवेदनशीलता:

"ग्रामीण साहित्य" ही एक वर्णनपर संज्ञा आहे. ती मूल्यदर्शक किंवा मूल्यवाचक नाही. काव्य, कादंबरी, या शब्दांना जसा मूल्य-वाचक अर्थ आहे तसा "ग्रामीण" या शब्दाला नाही. जरी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा अन्य साहित्यापेक्षा भिन्न असल्या तरी त्याच्या मूल्यमापनाचे निकष वेगळे असावेत असे कुणीही म्हणणार नाही.

गो·मा· पवार यांनी नेमकेपणाने असे म्हटले आहे की, "माझ्या मते ग्रामीण साहित्य ही सोयीसाठी वापरावयाची वर्णनपर संज्ञा आहे· ती मूल्यवाचक संज्ञा नाही·" ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक नाटक या शब्दप्रयोगातून ऐतिहासिक, सामाजिक ही विशेषणे केवळ वर्ण्यविषयाचा निर्देश करतात· त्याप्रमाणे ग्रामीण हे विशेषण विशिष्ट लेखनात कशाचे चित्रण आहे, याचा फक्त निर्देश करते; [१] असे सांगितले आहे· आनंद यादवांनीही याचा निर्देश करताना म्हटले आहे की, "भारतीय जीवनात व संस्कृतीत ग्रामीण साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे· इथल्या मातीचे दर्शन घडविणारे ते खास साहित्य आहे·"[२] ग्रामीण मनाचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडणे अपरिहार्यच आहे·

प्रेरणा भिन्नत्वामुळे दलित साहित्य व ग्रामीण साहित्य यात फरक आहे· दलित साहित्यामध्ये प्रक्षोभ, विद्रोह, बंड आहे· सवर्णां-च्याविरुद्ध लढा देण्याची प्रेरणा आहे· समाजाच्या प्रस्थापित चौकटीच्या मोडतोडीची भावना त्यात आहे· तीव्र असंतोष, सूडाची भावना आहे· त्यांचा हा विद्रोह नव्या समाजासाठी, नव्या समाज-रचनेसाठी आहे· त्यामुळे त्याला मर्यादाही पडतात· ज्या कथा, कादंब-ऱ्यात प्रक्षोभ आणि विद्रोह नसेल त्या दलित लेखकाने लिहिल्या असल्या तरी एकतर त्या नाकारल्या जातात, अन्यथा त्यात ओढून ताणून विद्रोह आणला जातो· या कारणांमुळे दलित साहित्यामध्ये एकसुरीपणा येत असल्याचे जाणवू लागले आहे·

इतर लेखकांची जी जीवनदर्शनाची प्रेरणा असते (नागरी/शहरी लेखकांची) तीच ग्रामीण साहित्यिकांची असते· ग्रामीण साहित्यामध्ये अनुभवाच्या दृष्टीने संपन्नता आहे· वेगवेगळ्या जाती, ताणातणाव, नियती आणि माणूस यांचा संघर्ष यांचे चित्रण येते· ग्रामीण

साहित्यिकांनी कोणतीही जीवनविषयक जाणीव नाकारलेली नाही. "कृषिप्रधानता शेतीचा उपयोग हा खेड्यांचा आत्मा आहे. हा आत्मा जोवर नाहीसा होत नाही तोवर भारतीय खेडे कितीही सुधारले तरी खेडेच रहाणार हे उघड आहे. त्यामुळे भारतीय जीवनात व संस्कृतीत ग्रामीण साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे." [१] हे पटते.

अस्सल ग्रामीण कथा व्हायची असेल तर ती अस्सल ग्रामीण जीवनावरच आधारलेली असली पाहिजे. केवळ वरवरचे ग्रामीण तपशील त्यात भरुन ती चांगली ग्रामीण कथा होऊ शकणार नाही. ना.सी. फडके यांच्या "बावनकशी" या कथासंग्रहात जवळजवळ निम्म्या कथा ग्रामीण परिसरावरच आधारलेल्या आहेत. पण फडक्यांना ग्रामीण जीवनाचा अनुभवच नाही. केवळ चूष म्हणून त्यांनी या कथा लिहिल्या. त्यामुळे तिथला तपशीलही त्यांना माहीत नाही. हेच कथा वाचल्यावर दिसून येते. मग ग्रामात राहणारा माणूस समजून घेणे तर दूरच राहते. या कथा केवळ चमत्कृतिजन्य व रंजक वाटतात. शहरी मनाला वेगळ्या जगाकडे पहायला लावतात पण त्यात जीव नसतो. या उलट म.भा. भोसले, ग.ल. ठोकळ यांना तर ग्रामीण जीवनाचा अनुभव होता. त्यांच्या कथेत तपशील योग्य आला पण ग्रामीण जीवनाचा गाभा त्या कथांमध्ये आला नाही. म्हणजे या-ही कथा फडके यांच्याच वाटेने जाताना दिसतात.

ग्रामीण साहित्याच्या अस्सलपणाचा प्रत्यय "ग्रामीण संवेदन-शीलते"च्या अंगानेच पडताळून पहाता येईल. याच आधारावर आपण लेखकाचे अनुभव घेणे व प्रकट करणे हे खरोखरीच सामर्थ्यवान आहे की

नाही ते ठरवू शकू. अनुभव घेण्याची व प्रकटीकरणाची वैशिष्टयपूर्ण रीत म्हणजे संवेदनशीलता होय. ज्या वातावरणात लेखक वाढतो त्याचे काही संस्कार त्याच्यावर होतात. त्याची लेखक म्हणून जडण घडण या संस्कारावरच होत असते. हे संस्कार जितके अस्सल तितका तो लेखक सामर्थ्यवान ठरत असतो.

संवेदनशीलतेचा विचार करताना त्यात ग्रामीण व नागर असा भेद करता येईल का ? याचे उत्तर होय असेच द्यावे लागेल. कारण खेड्यातील जीवनरहाटी आणि शहरातील जगण्याची पध्दती यांच्यामध्ये मूलभूत फरक आहे. त्यामुळे व्यक्तिमत्त्वावर होणाऱ्या संस्कारामध्येही हा फरक पडत जातो. खेडे हे सामूहिकरित्या जगणारे असते. गाव म्हणजेच एक मोठे कुटुंब असते. गावातला प्रत्येक माणूस दुसऱ्याला ओळखत असतो. त्यामुळे प्रत्येक व्यवहार हा गावाच्या साक्षीनेच होतो. या उलट शहरातली परिस्थिती असते. एकतर तिथे अनेक वर्ग कल्पिलेले असतात. शहरी सभ्यपणाचे संकेतही वेगळे असतात. कुणालाच कुणाशी मन:पूर्वक लागाबांधा जोडावयाचा नसतो. त्यामुळे शहरात माणसांची गर्दी असूनही माणूस तसा एकटाच असतो. खेड्यातल्यासारखी नात्यागोत्याची गुतवळ शहरात तयार होऊ दिली जात नाही. त्यामुळे एकप्रकारचे तुटलेपण माणसांना प्राप्त होते. ती एकाकी होतात. ही व्यक्तीकेंद्रितता खेड्यात नसते. म्हणूनच ग्रामीण भागात वाढलेला लेखक सामाजिक स्वरूपानेच घटनेकडे पाहतो. शहरीकथांना व्यक्तिकेंद्रितपणा येतो. तो ही यामुळेच. खेड्यातील सामूहिक जीवनाविषयी गो.मा. पवार यांनी केलेले विवेचन अधिक अर्थपूर्ण वाटते. "समाजातील सगळेजण एकमेकांशी बांधलेले आहेत. आपण या समाजाचा एक

घटक आहोत अशी जाणीव निर्माण होते. अशी जाणीव या व्यक्तीच्या ठायी निर्माण झाली म्हणजे ती जीवनाचा अनुभव स्वयंकेंद्रितपणे न घेता समाजशीलवृत्तीने, माणसाच्या व्यापक भूमिकेवरून घ्यायला लागतो. या प्रकारे अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी म्हणजे ग्रामीण संवेदनशीलता होय. अशा प्रकारे अनुभव घेणाऱ्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला आहे असे म्हणता येईल." ४

या अस्सल ग्रामीण संवेदनशीलतेच्या आधारे आपण असे म्हणू शकू की व्यंकटेश माडगूळकर हे अस्सल ग्रामीण संवेदनशील लेखक ठरतात. त्यांच्या कथेतले कुठलेही पात्र सामाजिक स्वरूपाचेच असते. ते कधी एकटे नसते. त्याचा गोतावळा, त्याचा समाज हा सतत त्याच्या बरोबरच असतो. त्यानंतर ग्रामीण माणसांच्या मनावरील ताणांचे चित्रण करणारे शंकर पाटील, आनंद यादवांच्या पूर्वीच्या काही कथा, रा.रं. बोराडे यांच्या "मळणी" व "नातीगोती" मधील कथा त्यांच्या अस्सल ग्रामीण संवेदनशीलतेचा प्रत्यय आणून देतात.

ग्रामरचनेचे स्वरूप:

रा.रं.बोराडे हे ग्रामीण जीवनावर कथा लिहिणारे आहेत. त्यामुळे ग्रामरचनेचे स्वरूप पाहणे अगत्याचे ठरते.

खेड्याची रचना ही समूहाची असते. शेती हाच प्रमुख व्यवसाय. शेतकरी हा महत्त्वाचा घटक. शेतकरी केंद्रस्थानी असतो व बलुतेदार त्याच्याभोवती उपयोगासाठी असतात. इथले जीवन एकमेकांवर अवलंबून असते. अजूनही बलुतेदारी हा खेड्यातील जीवनाचा अविभाज्य भाग आहे. एकच चांभार, लोहार असतो, त्याच्या गैरहजेरीत शेतीची कामे खोळंबलेली दिसतात.

जातीयतेच्या निकषावर गावामध्ये अल्पसंख्य आणि बहुसंख्य असे दोन गट पडलेले दिसतात. आज तरी मराठा समाज हा बहुसंख्येने दिसतो. बहुसंख्यांकाच्या हातात गावाची सूत्रे असतात. त्यामुळे पाटील हा त्यांच्यापैकीच असतो. तोच गावचा प्रमुख कारभारी असतो. भांडणाऱ्या भावांना चार समजुतीच्या गोष्टी सांगण्यापासून ते शेतीतील बांधाच्या भांडणा, मारामाऱ्या, घराच्या वाटण्यापर्यंत अनेक गोष्टीत पाटलाचा शब्द प्रमाण मानला जातो. अधिकार आहेत म्हणून त्याचा गैरफायदा घेण्याचा प्रकार सहसा घडत नाही. अल्पसंख्यांकांना नेहमीच इतरांशी मिळते जुळते घेऊन वागावे लागते. अर्थात् बहुसंख्यांकही त्यांना चांगुलपणाने वागवत असतात. इथली परटीणही दिवाळीत मालकाला ओवाळते. विभिन्न जातीतील वडिलधाऱ्यांना मामा, काका म्हणावे अशी मुलांना शिकवण असते. एकप्रकारची आपुलकी खेड्यातल्या माणसांत पहायला मिळते.

गाव कितीही लहान असो, त्याच्या म्हणून काही परंपरा असतात. श्रध्दा हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतो. गावात, मारुती, महादेव, खंडोबा यासारखी देवस्थाने असतात. काही लहान मोठ्या ग्रामदेवताही असतात. या देवांच्या वार्षिक जत्रा असतात. सुगीची कामे आटोपून थोडासा निवांतपणा मिळाल्यावरच जत्रांचा मोसम सुरु होतो. नवस बोलले जातात. नव्या पिकातील काही भाग देवाला देऊनच पिके घरी आणली जातात. वेळप्रसंगी थोडे कर्ज झाले तरीही या परंपरागत श्रध्दा जपल्या जातात. श्रध्देच्या जोडीला काही अंधश्रध्दाही दिसतात.

"एक तर ग्रामीण समाज (दलित त्यातच समाविष्ट) हा तसा सरधोपटपणे जगणारा असतो. त्याचे जगणे, अनुभवणे, विचार करणे

हे शहरवासी बुध्दिजीवी माणसाच्या तुलनेने वेगळे आणि सरळधोपट असते. प्राथमिक गरजांसाठी झगड्यातच बहुधा ते संपुष्टात येते." ५ हे आनंद यादवांचे म्हणणे अगदीच पटण्यासारखे आहे.

मोसमी पावसावर अवलंबून असलेली शेती हुकमी कधीच पिकत नाही. त्यामुळे दारिद्र्याला आणि उपासमारीला सतत तोंड धावे लागते.

इथल्या लग्नासंबंधीही खास रीत पाळली जाते. लग्नसंबंध फार कटाक्षाने, सावधपणे आणि सन्मानाने केले जातात. एकाच जातीतही अनेक पोटभेद असतात. मानसन्मानाच्या कल्पना अतिशय तीव्र असतात. या ठिकाणी रूढींचा संबंध येतो. गेल्या कित्येक पिढ्यांमध्ये जे संकेत लग्नसंबंधाने पाळले गेले त्यात बदल केला जात नाही. "नागर वा ग्रामीण जीवनात ब-याच गोष्टी समान असल्यासारख्या दिसतात. उदा. "हुंडा" ही पध्दती आपल्या संस्कृतीत (ती अयोग्य मानत असलो तरी) अजूनही रूढ आहे. नव-या मुलीच्या बापाला लग्नात वा लग्न झाल्यावरही बराच काळ नवरा मुलगा वा त्याची माणसे विविध प्रकारांनी लुबाडत असतात. ....पुरुषाला आपला अहंकार गोंजारण्याची व वरकडी करण्याची या प्रकरणात खूप संधी मिळते."६

खेड्यातील कुटुंबपध्दती पितृसत्ताक आहे. त्यामुळे पुरुषच श्रेष्ठ ही कल्पना पक्की रूजलेली आहे. बाप म्हातारा झाल्यावर कर्त्या मुलाकडेच अधिकाराची सूत्रे येतात. हाच कारभारी होतो. त्याचा निर्णय कुटुंबात सर्वांनाच बंधनकारक असतो. घरातील पाहुणे, कापड, लग्नविधी, याची योजना कारभारीच करतो. थोडक्यात पुरुषप्रधान संस्कृती हे ग्रामजीवनाचे वैशिष्टय आहे. बायका या बायकाच आहेत

त्यांनी नमून, जुळते घेऊन वागले पाहिजे असे समजले जाते. जातीय उतरंड ही गावाप्रमाणेच घरातही असते.

खेड्यातील आणखी एक घटक म्हणजे दलित वर्ग. संख्येने अल्प असणारा हा वर्ग गावाला हरकामात मदत करीत असतो. गावाचेही त्यांच्याकडे लक्ष असते. वेळप्रसंगी त्यांना धान्य देण्यापासून ते पै-पैशाच्या अडचणीही भागविल्या जातात. शेतकऱ्याला सुगीच्या दिवसात विशेष मदत करणारा, कष्टाळू आणि विश्वासू असा हा वर्ग मानला जातो. गावाच्या सुख दु:खात सामील होऊन मयताचा सांगावा पोहचविणे, खळ्याची, वाड्याची राखण करणे, चोरीचा माग काढणे, गावाच्या शिवारातील पिकाची राखण करणे, हद्दीवर लक्ष ठेवणे यासारखी अनेक जबाबदारीची कामे निष्ठेने पार पाडली जातात. गावचा पाटील हा यांच्या श्रद्धेचा विषय असतो. थोडक्यात सर्वच जातींनी एकमेकांबद्दल प्रेमभाव बाळगलेला दिसतो. एखादेवेळी जातीजातीतील संघर्ष होण्याचीही शक्यता असते. पण हे फारच अपवादाने घडते.

गावच्या सामूहिक जाणिवेचा आविष्कार वेगवेगळ्या प्रकारे घडत असतो. गो.मा. पवार यांनी म्हटल्याप्रमाणे, "गावात कोणातीही सुखदु:खाची घटना घडली तर त्याचे सगळ्यांनाच सुख वा दु:ख. एखाद्या घरातली सून माहेराहून आली म्हणजे गावभर शिदोरी वाटली जाते. जणू ही घटना सगळ्यांना शिदोरीमार्फत कळावी अशी इतरांच्याही जिव्हाळ्याची. गावातील कोणत्याही जातीच्या एका घराचा जावई हा केवळ त्या घराचा जावई नसतो. गावचा जावई असाच आत्मियतेने त्याचा सगळेजण उल्लेख करतात. एखाद्याकडून अभिमानास्पद कामगिरी घडली तर त्याचा अभिमान साऱ्या गावाला, लांच्छनास्पद गोष्ट

घडली तर त्याची लाज आणि चीडही सा-या गावाला." ७

थोडक्यात निसर्गाच्या लहरीवर जगावे लागत असल्याने इथला माणूस दैववादी होतो. "नशिबात व्हायचे ते होईल" असे पालुपद ऐकायला मिळते. इथली मने घडविण्यात निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा वाटा असतो. यापुढेही खेडी बदलतील असे आपण म्हणू शकलो तरीही त्यातला माणूसपणाचा मूळ प्रवाह तोच राहील. हे सांगताना आनंद यादव म्हणतात, "....ती खेडी फार तर आजच्या बागायती खेड्यांसारखी होतील. तेथील निसर्ग, शेती, अंगमेहनतीची कामे, माणसांचा लहान समाज रहाणारच. फार तर ग्रामीण जीवनात परिवर्तने होतील पण ग्रामीण जीवन म्हणजे नागरजीवनाचा एक छोटासा तुकडा असे मात्र होणे शक्य नाही. ते तर्कदुष्टही आहे."

ग्रामीण साहित्याचे हे स्वरूप सर्वसामान्यपणे असे असते. रा.रं. बोराडे यांच्या कथालेखनातील सामाजिकतेचे स्वरूप ध्यानात घेण्याच्या आधी प्रमुख मराठी ग्रामीण कथाकारांच्या लेखनाची वैशिष्टये ध्यानात घेऊ म्हणजे त्या पार्श्वभूमीवर बोराडे यांच्या कथालेखनातील सामाजिकतेच्या चित्रणाची वैशिष्टयपूर्णता व वेगळेपणा विशेषत्वाने ध्यानात येऊ शकेल.

## हरिभाऊ आपटे:

आज आपणाला ग्रामीण जीवनाचे अनेकांगी दर्शन घडविणारी जी ग्रामीण कथा दिसते तिच्या उगमाकडे जाताना हरिभाऊ आपटे यांच्या "काळ तर मोठा कठीण आला" या कथेपाशी येऊन थांबावे

लागते. १८९७ मध्ये महाराष्ट्रात जो भयानक दुष्काळ पडला, त्याची वृत्ते डेक्कनसभेच्या कागदपत्रांमध्ये हरिभाऊंना वाचायला मिळाली. त्यावरच "काळ तर..." ही कथा लिहीली. हरिभाऊंना ग्रामीण जीवनाचा अनुभव नव्हता. पण तरीही शेतकऱ्याच्या जीवनाची दुर्दशा त्यांनी रंगविली. "शेतकरी जीवनाची सगळीच वाताहत एकाच कथेत आणावयाची इच्छा धरल्याने असंभाव्यतेला ही कथा मध्यानंतर स्पर्श करीत पुढे सरकते. अद्भुताला सामोरी जाते." १ हे आनंद यादवांचे म्हणणे खरे वाटते.

ग्रामीण जीवनाचा अनुभव नसला तरी मराठी साहित्यामध्ये कथेच्या स्थाने शेतकऱ्याचे जीवनदर्शन घडविण्याची कामगिरी हरिभाऊंनी पार पाडली. असे असले तरी, "हरिभाऊंची "काळ तर मोठा कठीण आला" ही स्फुट गोष्ट एक वाङ्मयीन अपघात वाटते. ग्रामीण जीवनाच्या खास जाणिवा घेऊन ती जन्माला आलेली नाही. केवळ आज ग्रामीण वाङ्मयाच्या विपुलतेमुळे, त्याच्या जन्माचा शोध घेत घेत भूतकाळात जाताना ती एक खूण दिसते एवढेच." १

वि.स. सुखठणकर:

पहिल्यांदा खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवनाचे जाणिवपूर्वक दर्शन घडविण्याचे काम सुखठणकरांनी केले. त्या त्या परिस्थितीचा परिणाम लेखकावर अपरिहार्यपणे होत असतो हे त्यांच्या कथा वाचल्यावर ध्यानात येते. १९२० नंतर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव वाढत गेला. खेड्यातील जीवनदर्शन घडविताना सुखठणकरांनी कथेचा उपयोग प्रबोधनासाठी केला. १९११ साली "सह्याद्रीच्या

पायथ्याशी" हा त्यांचा आठ कथांचा संग्रह प्रसिध्द झाला. गोव्यातील जीवन, देवदासींची अमानुष पध्दत, गावातील हाडवैर, जीवघेणे तंटे, गरीब आणि श्रीमंतांच्यामधील भांडणे, अंधश्रध्देने ख्रिस्ती आणि हिंदू यांच्यातील निर्माण झालेले तणाव, शेतकरी आणि जमिनदारांच्या कुरकुरी अशा अनेक प्रवृत्तींवर प्रकाश टाकण्याचे काम सुखठणकरांनी केले. कथेतील योगायोगांची गर्दी, कधी आदर्शाच्या आत्यंतिक टोकाचे चित्रण, या कथेत येत असले तरीही, "ग्रामीण जीवनाचा सांगाडा त्यात सापडतो. आणि माणसांच्या प्रवृत्ती कळतात." १० समाजदर्शनापेक्षाही समाजप्रबोधन हेच सुखठणकरांना अभिप्रेत होते असे दिसते.

श्री.म.माटे:

"उपेक्षितांचे अंतरंग" आणि "माणुसकीचा गहिवर" अशा कथासंग्रहामधून माटयांनी रानावनात वावरणारा, फरफटत जगणारा माणूस उभा केला. समाजातल्या उपेक्षितांचे जीवन हे कसे अस्थिर आणि करूणाजनक आहे याचा प्रत्यय माटयांनी आपल्या कथामधून आणून दिला. माटे यांचा पिंड समाजसुधारकाचा होता असे असले तरी कथालेखनातून प्रचार साधावा हे त्यांनाही मान्य नसावे. माटे यांनी रंगविलेला "तारळ खो-यातील पि-या" तालेवाराने हुलीवर घातल्याने खूनही करावयास तयार होतो. गळ्यातील कंठी आणि मुंडासे याच्या मोबदल्यात त्याला भोगावा लागतो तो रानावनातील वनवास. पि-याची एकनिष्ठ आणि मायाळू चंद्री त्याच्यासाठी डोंगरकपारीत माग काढून त्याला भाकरी पोहोचविते. पण हाच पि-या आपण पकडले जाऊ याची भीती न बाळगता खंडोबाच्या जत्रेला जातो. . त्याची श्रध्दा खंडोबावर आहे. त्याला पकडायला आलेल्या नाईकालाही तो

सहीसलामत त्याच्या लेकराबाळात सोडतो.

माटयांना ही माणसे चोऱ्या, दरोडे का घालतात, याचे समाजशास्त्रीय विश्लेषण द्यावेसे वाटत नाही. पण ही सुद्धा माणसेच आहेत. ती अशिक्षित, रांगडी असतील तरीही मायाळू आणि श्रद्धावान आहेत. हेच दाखवून दिले. माटयांचा अनाथ बन्सीधर, काहीही न बोलणारी फक्त सोसणारी वृतस्थ सावित्री, डोळ्यासमोर हातचे पिक चालले म्हणून आकांत करणारा भिवा, संभाजी, गंगाराम, रामभरोशी ही माणसे जिवंत होऊनच आपल्यासमोर उभी राहतात. त्यांच्या मनातली खळबळ आपणाला जाणवू लागते. म्हणून आनंद यादव यांनी म्हटल्याप्रमाणे, "माटयांच्या कथेत कस मोठा जीवनाची अर्थपूर्णता पाहण्याची कुवत प्रतिभावंताची. म्हणूनच त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व गेले."[११] पुढे त्यांनीच म्हटले आहे की, "प्रगाढ माणुसकीने ते कथा लिहितात. त्यामुळे तिला सामाजिकतेचा प्रचंड अर्थ प्राप्त होतो. तिचा व्यापही तसाच मोठा होतो..... त्यांना व्यक्तीचे सबंध जीवन हाच एक अनुभव वाटतो. त्यांच्या व्यक्तीच्या या सबंध जीवनामुळे त्यांचा सांधा सामाजिकतेशी जोडला जातो."[१२] माटयांची ही माणसे खऱ्याअर्थाने मराठमोळी वाटतात. माटयांच्या शैलीचाही उल्लेख गंगाधर गाडगीळांनी केला तो असा की, "ती मराठमोळी आहे हे वळण तुम्हाला जुन्या काळात "वाईकर भटजी" च्या लेखनात आढळते."[१३] सामाजिकतेच्या चित्रणाचा विचार करता माटे खूपच यशस्वी झाले आहेत असे म्हणावेसे वाटते.

## ग.ल. ठोकळ:

ग्रामीण जीवनाचा अनुभव असूनही ग.ल. ठोकळ यांची कथा अधिक काव्यमय झाली. त्यामुळे कथेतील घटना महत्त्वाची की भाषाशैली

या चक्रात त्यांना भाषाशैलीच अधिक महत्त्वाची वाटली. आशयाच्या विस्ताराच्या दृष्टीने खूप नवनवे विषय ठोकळांनी ग्रामीण कथेला दिले. खेड्यातील रांगडा प्रणय, त्यांचा आडदांडपणा, सण, उत्सव, सुगीचे मोहक दिवस, गावातल्या भानगडी आणि भटक्या जमातीचे चित्रणाही केले. पण या विस्ताराला खोली लाभू शकली नाही. नागर कथेमध्ये ना. सी. फडके यांनी जो भाषेचा फुलोरा उभा केला होता तोच ठोकळांनी ग्रामीण कथेमध्ये आणला. आरंभ, मध्य, शेवट या तीनही गोष्टी आकर्षक करून मांडल्या. घटना व घटनांमागील ढोबळ नाटय चित्रित केले.

"नीट नाकासमोर जा" या कथेतही हे जाणवते. जिवबा-शेवंता आणि गणूमास्तर हा प्रेमाचा सांकेतिक त्रिकोण केवळ ग्रामीण म्हणून आपल्यासमोर मांडला. जिवबा मेलेला नाही हे माहीत असूनही गणूमास्तर शेवंताशी लग्न करण्याचे ठरवितो, आणि पुण्यात लग्नाचे कपडे आणायला गेल्यानंतर जिवबा जिवंत आहे हे त्याला रेडिओवरील बातम्यांवरून कळते. मग शेवंताशी लग्न करण्याचा त्याचा बेत रहित होतो. या भावानुभवाच्या रेखाटनात योगायोग येतात. त्यामुळे गणूमास्तरांच्या मनातील नाटय परिणामकारक ठरत नाही. ठोकळांच्या कथेतले हे हरघडी येणारे योगायोग कृत्रिम बनतात. "त्यामुळे मनोरंजकतेच्या दृष्टीने त्यांची कथा प्रभावी झाली असली तरी ग्रामीणतेच्यादृष्टीने ती फिकी होते."[१४] ठोकळांची कथा ही अशी रोमँटिक होत गेली. आनंद यादव म्हणतात, "....या सर्वांच्या आराधनेत वास्तवातील ग्रामीणता हरवून तिचा फक्त ग्रामीणाचे काहीही ज्ञान नसलेल्या मध्यमवर्गीय वाचकासाठी आभास ठरला."[१५] सामाजिकतेच्या अंगाने जीवनदर्शन घडविण्याचा विचारही ठोकळांच्या कथेने केलेला दिसत नाही.

र॰वा॰ दिघे:

कोकणाच्या समुद्रकिनाऱ्यावर रहाणाऱ्या माणसांचे जीवनचित्र र॰वा॰ दिघे यांनी उभे केले॰ कथाकाराने "पोज" घेतल्यावर कथा निर्जीवतेकडे कशी झुकते याचा प्रत्यय दिघे यांच्या कथा वाचल्यावर येतो॰ काव्यमय वर्णनाच्या आतषबाजीत कथेतला जिवंत माणूस हरवून गेला. कथा सपाट होत गेली॰ कल्पनारम्यता आणि अद्भुतता यांचे मिश्रण त्यांच्या कथेत असते॰ कोकणाच्या खेड्यातील संभाव्य सुधारणा दाखविण्याचा मोहही त्यांना होतो॰ जीवनाच्या गांभीर्यापेक्षाही हलकेफुलकेपणाकडे त्यांचा कल अधिक होता॰ सामाजिक वास्तवाचे चित्रण करण्यापेक्षा त्यांची कथा अद्भुतात रममाण होताना दिसते॰

म॰भा॰ भोसले:

ग्रामीण जीवनाला मुळापासून स्पर्श करू शकणारी, ग्रामीण जीवनाच्या अनेकपदरी व्यक्तिमत्त्वाला भोसले शब्दबद्ध करू शकले नाहीत॰ तरीही संघर्षासारखा ग्रामीण जीवनातला एखादा घटकही त्यांनी सहजपणे रंगविला हे ही दृष्टीआड करून चालत नाही॰ हा संघर्ष तितकासा जोरकस नसल्याने कथा एकसुरी होत गेली॰ ग्रामीण जीवनाचा तपशील भोसल्यांनी घेतला पण त्यात ग्रामीण जीवनाचा गाभा आला नाही॰

व्यंकटेश माडगूळकर:

ग्रामीण कथेला आशयाच्या, अभिव्यक्तीच्या अंगाने समृद्ध करण्याचे काम व्यंकटेश माडगूळकरांनी पहिल्यांदाच केले॰ ग्रामीण जीवनाचा भरपूर अनुभव आणि दैवदत्त कलात्मक जाणीव यामुळे

त्यांच्या कथा या ख-या माणसांच्या जिवंत कथा ठरल्या. "माणदेशी माणसे", "गावाकडच्या गोष्टी", "हस्ताचा पाऊस", "उंबरठा" या त्यांच्या संग्रहातून त्यांनी रखरखता दुष्काळी माणदेश उभा केला. गेल्या कित्येक शतकांमध्ये उपेक्षित असणारे हे ग्रामजीवन त्यांनी फार सहजपणे तरीही सखोलपणे मांडले. "माडगूळकरांची कथा प्रथमदर्शनीच वा-यावर डोलणा-या एखाद्या रानफुलांच्या ताटव्या-सारखी वाटते" असे सांगून प्रल्हाद वडेर म्हणतात, "माडगूळकरांची कथा म्हणजे केवळ राहवले नाही म्हणून झालेला तो एक उत्स्फूर्त आविष्कार वाटावा इतकी त्यातली सहजता मनाला भिडते, आणि त्यातच त्यांच्या कथेचा नवेपणा, वेगळेपणा आहे. ग्रामीण जीवनाचे अकृत्रिम चित्रण त्यांनीच प्रथम केले. किंबहुना त्यांच्या पूर्वीचा काळच असा होता की त्यावेळच्या सा-याच लेखकांना कसे सांगावयाचे हे माहीत होते. फक्त त्यांच्याजवळ सांगण्यासारखे फार थोडे होते."[१६] माणदेशा-तील खुळी, भोळी, कावेबाज, हरहुन्नरी, खुनशी, मायाळू, मातीवर प्रेम करणारी, कष्टाळू, जाणती आणि तालेवार अशा अनेक प्रकारच्या माणसांचे संमेलन म्हणजेच माडगूळकरांच्या कथा होत. माडगूळकरांनी दोन दृष्टींनी वाङ्‌मयीन ऐतिहासिक कार्य केले. एक तर श्रेष्ठ वाङ्‌मय कृती निर्माण केली आणि दुसरे आशयाच्या व भाषेच्या बाबतीत मराठी वाङ्‌मयाला चांगल्या अंगाने वळण लावण्याचे ऐतिहासिक कार्यही केले. हे सांगताना गो. मा. पवार म्हणतात, "माडगूळकरांनी प्राधान्याने संवादासाठी ग्रामीण व निवेदनासाठी नागरमराठी अशी भाषा वापरली हे कार्य माडगूळकरांनी अत्यंत कौशल्याने व जबाबदारपणे केले. ग्रामीण भाषेचा मराठी वाचकांना हळूहळू सराव दिला. निवेदनातही काही ग्रामीण शब्द वापरून नागर वाचकांची ही भाषा समजून घेण्याची कुवत

वाढविली व नागरभाषा व ग्रामीणभाषा यांच्यामध्ये सेतू बांधून एकंदरीत मराठी भाषा समृध्द करण्याचे अपूर्व काम केले. नागरभाषेच्या दडपणातून पुढच्या पिढीतल्या लेखकांना मुक्त केले."१७

माणदेशाच्या कथा वाचत असताना आपण त्या कथेतील पात्राबरोबरच चालत असल्याचा भास होत राहतो. "बाजारची वाट" सारख्या कथा वाचल्यानंतर या कथेत ग्रामीण वास्तवता आणि सूक्ष्म नाट्य एकत्र आल्याचे जाणवते. संकेत, श्रध्दा, परंपरा यांना चिकटून रहाणारा ग्रामीण समाज फार समजूतदारपणे उभा केला. म.द. हातकणंगलेकरांनी म्हटल्याप्रमाणे "त्यांनी मराठी ग्रामीण कथेचे आद्य व अभिजात पीठ स्थापन केले."१८ माडगूळकरांच्या पूर्वीच्या कथेतली कृत्रिमता आणि अद्भुतता यांना वर्ज्य करण्याचे काम या कथेने केले आणि ग्रामीण कथेला नवकथेच्या शेजारी आणून बसविले. कथा-रचनेचे जुने संकेत आणि तंत्र फेकून दिले. निवेदनाच्या विविध शैलीचा प्रत्यय आणून दिला. उपदेशाला पूर्णपणे वगळून अनुभवाकडे अत्यंत संयमाने पहायला शिकविले. माडगूळकरांनी कथा वास्तववादी केली. पण समाजाकडे विविध अंगाने पाहून त्यातले वास्तव माडगूळकरांनी चित्रित केले. थोडक्यात पुढच्या ग्रामीण कथाकारांना घडविणारे माडगूळकर हे एक "जंक्शन" ठरले आहे.

### शंकर पाटील:

सुरुवातीला व्यंकटेश माडगूळकरांच्याच पावलावर पाऊल टाकून शंकर पाटलांनी कथालेखनाला प्रारंभ केला. असे असले तरी या अनुकरणातून त्यांची कथा लवकर मुक्त झाली आणि माणसाच्या अंतरंगाच्या दर्शनावर भर देऊ लागली. मनोविश्लेषण करणाऱ्या

कथा "वळीव", "भेटीगाठी", "ऊन" या संग्रहामध्ये वाचावयास मिळतात. शंकर पाटील यांनी प्रामुख्याने स्त्रियांच्या जीवनाचा कोंडमारा मनोविश्लेषणाच्या अंगाने चित्रित केला. माणसांच्या कथा त्यांनी लिहिल्या पण त्याहीपेक्षा ते लक्षात रहातात ते कुटुंबकथा लेखक म्हणून.

"आभाळ", "वेणा", "भार" यासारख्या कथांतून त्यांनी स्त्रियांच्या दु:खाचे चित्रण चांगले केले आहे. "शंकर पाटील यांच्या बहुतेक गंभीर कथा स्त्रियांच्या दु:खासंबंधी आहेत. त्यांच्यात सोसणे कमी व आकांत अधिक आहे. तर माडगूळकरांच्या कथातील दु:खे ही पुरुषाची आहेत. या विषयविभिन्नतेमुळे कथांच्या संयमात व गहिरे-पणातही भिन्नता निर्माण झाली आहे. पाटलांच्या कथेला आविष्कार पद्धतीत व भाषाशैलीत काही नवी वैशिष्टये मात्र आली. ही शैली आत्ममग्न, स्वगत किंवा स्वगीतासारखी झाली. स्वत:च्या दु:खाची कर्मकहाणी स्वत:शीच आळवल्यासारखी, गा-हाणे झुलत झुलत मांडल्यासारखी निवेदनाची शैली तयार झाली."१९

खेड्यातील जीवनापेक्षाही खेड्यातील माणसाच्या मनाचा विचार त्यांनी अधिक केला. हे ही मराठी ग्रामीण कथेला नवीनच होते. तरीही चंद्रकांत बांदिवडेकरांनी खंत व्यक्त केली आहे की, "ग्रामीण जीवनातील बाहय स्थित्यंतराचा व त्यामुळे ढवळून जाणा-या ग्रामीण मनाचा वेध पुरेसा व्यापकपणे पाटील घेऊ शकले नाहीत असे वाटते. आणि त्याचे कारण त्यांनी स्वत:च सांगितल्याप्रमाणे ते बालपणी जे विश्व रसरसून जगले तेवढेच ते व्यक्त करतात असे वाटते. आणि माणसामाणसातल्या विविध संबंधांचे खरे तळकोपरे त्यांच्या लक्षात येत नाहीत. म्हणून पाटलांच्या कथात मानवी संबंधातील क्रौर्य,

हिंस्त्रता, शोषण फारसे आले नाही."२० सामाजिकतेच्या दृष्टीने विचार करताही त्यांनी समाजापेक्षाही व्यक्ती आणि त्यांच्या मनाचा गुंता हाच अधिकपणाने व्यक्त केला. पाटील ही ख-या व्यापक अर्थाने सामाजिकतेला स्पर्श करु शकले नाहीत.

## उद्दव शेळके:

विदर्भातील ग्रामजीवनाचे चित्रण शेळके यांनी केले. या मातीत अत्यंत दरिद्री अवस्थेत राहणा-या, वेदनामय जीवन जगणारी ही माणसे शिक्षणापासूनही खूप दूर आहेत. परंपरेने पदरात टाकलेले सनातन दुःखच ते वागवीत आहेत. दारिद्र्यातही कमालीची सोशिक असणारी ही माणसे त्यांच्याच बोलीभाषेत आपली दुःखे सांगताना दिसतात. "कोणत्याही विशिष्ट विचारसरणीचा चष्मा न घालता शेळके यांनी उपेक्षित, पीडित व दरिद्री माणसांच्या व्यथांना वाणी दिली."२१ तरीही सामाजिकदृष्टया सखोल चित्रण शेळके करु शकले नाहीत.

## आनंद यादव:

"मातीखालची माती", "खळाळ", "झ्वरणी" या संग्रहातून यादवांनी ग्रामीण शेतमजुराची दुःखे रंगविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण जीवनातील कष्टाचा अनुभव असणारे यादव चिंतनशीलतेला अधिक महत्त्व देतात. खेड्यात राबणाराविषयी तळमळ, दारिद्र्यामुळे अन्नालाही महाग झालेल्या लोकांची भावनिक ओढाताण, त्यामुळे निर्माण झालेले ताण, शेतक-याच्या जीवनात येणारी नैसर्गिक संकटे व मानवनिर्मित संकटे, यांत्रिकीकरणामुळे झालेला भावनिक कोंडमारा यामुळे यादवांची

कथा अधिक सकस बनत गेली. त्यांनी तिला काव्यात्मतेची जोड देण्याचाही प्रयत्न केला. "खळाळ" मधील कथांनी विशेषत: हे दाखवून दिले. पुण्यातील नवथरपणा, त्यातले कोमेजलेपणा, प्राण्या-पक्ष्यांवरील आंतरिक माया आणि जगण्याची अथक धडपड यांच्या दर्शनाने वाचकही सुखावून जावा अशा कथा यादवांनी लिहिल्या. त्यांनी प्रयत्नपूर्वक बोलीभाषेचाही वापर केला. त्यामुळे कथेच्या जिवंतपणाला आणखी बळ मिळाले.

म.द. हातकणंगलेकरांनी यादवांच्या भाषाशैलीबाबत म्हटले आहे की, "यादवांचा 'खळाळ' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आणि त्यातील, 'मोट', 'धूणं' यासारख्या कथांतील भाषेच्या सुरावटीने मन हर्षभरित झाले. त्यातल्या थंडगार, खळाळत्या लावण्याने मनाला पालवी फुटली. त्यांच्या या कथात खेड्यातील जीवनाचे व्याकुळ आकलन दिसले. या आकलनाला कथारूप देताना सुरावटीच्या रचने-सारखी कथेची रचना करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि चिंतनशील निवेदनाची एक वेगळी बंदिश निर्माण केली."२२ असे सांगून ग्रामीण कथेच्या दुसऱ्या कलावेधी व शैलीप्रयोगी टप्प्याचे श्रेयही आनंद यादवांना दिलेले आहे.

सारांश:

सामान्यपणे १९२५ पासूनच ग्रामीण जीवनाला साहित्यामध्ये स्थान मिळाले. नवकथेचा परिणाम ग्रामीण जीवनचित्रण करणाऱ्या कथाकारांवरही झाला. त्यामुळे कथेला अतिरंजिततेपेक्षाही वास्तववादी केले पाहिजे याची जाण येऊ लागली. शिक्षणाच्या प्रसाराने खेड्यातील लेखकही आपले दु:ख मांडू लागला.

ग्रामीण साहित्य ही वर्णनपर संज्ञा आहे. ग्रामीण जीवनाचे, ग्रामीण माणसाच्या मनाचे चित्रण करणारे तेच खरे ग्रामीण साहित्य होय. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांच्यात मूलत:च भेद आहे की, ग्रामीण साहित्यातील वास्तव हे त्या समाजाला पूर्णपणाने आहे त्या परिस्थितीत अभिव्यक्त करू पहाते. याउलट दलित साहित्यामधले वास्तवही ओढून ताणून आणल्यासारखे, बंड, सूड, नकार, विद्रोह याच्यासाठीच राबविल्यासारखे वाटते. असे जेव्हा होते तेव्हा त्यात एकसुरीपणा येणे ही अटळ गोष्ट ठरते.

वरवरचे, ऐकीव आणि न अनुभवलेले सुख किंवा दु:खाचे तपशील देऊन कथा ग्रामीण करता येत नाही. त्यासाठी ग्रामीण जीवनातील अस्सल अनुभवच हवे असतात. अन्यथा ती कथा धड ग्रामीणही होत नाही व नागरही. अनेक लेखकांची अशी गफलत झालेली पहायला मिळते. लेखकाच्या अनुभवाच्या ग्रहणाला व प्रकटीकरणाच्या सामर्थ्यालाच संवेदनशीलता म्हणता येईल.

खेडे आणि शहराच्या रीतीरिवाजात फरक आहे. खेडे हे एकाच कुटुंबासारखे, तर शहरात व्यक्तिकेंद्रिततेला अधिक महत्त्व आपोआपच येते. खेड्यात अनेक जातीचे लोक रहात असूनही त्यांच्यात भावंडपणा असतो. एकमेकांच्या गरजा, अडचणी ओळखल्या जातात. भागवल्या जातात. पाटील हाच मुख्य कारभारी असतो. लहानसहान कुरबुरीपासून ते भावकीच्या मारामाऱ्यापर्यंतचा निवाडा पाटलालाच करावा लागतो. दलितांशी गावाची वागणूक प्रेमाची असते. गावातील देवदेवतांच्या यात्रा भरविल्या जातात. "श्रद्धा" हा अविभाज्य भाग मानला जातो.

पाऊस अनियमित असल्याने शेती नेहमी अपुरीच पिकते. त्यामुळे

उपासमारीचे संकट उभे रहाते. लग्नाच्या संदर्भात परंपरागत स्त्रीचे प्राबल्य अधिक. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमुळे पुरुषच श्रेष्ठ मानला जातो. स्त्रियांना कमीपणाची वागणूक मिळते. निसर्गाच्या लहरीवरच जगावे लागत असल्याने शेतकरी दैववादी बनलेला दिसतो.

१८९७ च्या दुष्काळाचे चित्रण करणारी "काळ तर मोठा कठीण आला" ही हरिभाऊंची गोष्ट ग्रामीण कथेच्या जन्माची खूण मानली जाते. शेतकऱ्याची दुर्दशा त्यांनी रंगविली. ग्रामीण कथेची सुरुवातच वास्तवतेतून झाली असे म्हणावे लागते. सुखठणकर सरदेसाई यांनी समाजचित्रणापेक्षाही समाज प्रबोधनासाठी कथा लिहिल्या. स्वातंत्र्यासाठी लोकांच्या स्वाभिमानाला जाग आणली पाहिजे असे त्यांना वाटत होते.

श्री.म. माटेंयांनी मात्र खऱ्या अर्थाने ही माणसांची कथा केली. "उपेक्षितांचे अंतरंग" उलगडून दाखविले. त्यांच्यातील "माणुसकीचा गहिवर" कसा अनावर आहे याची प्रचिती आणून दिली. म्हणूनच ग्रामीण कथेचे जनकत्व त्यांच्याकडे जाते. समाजातील उपेक्षित माणसांचे चित्रण करून माटेंयांनी खरे समाजदर्शन घडविले. ठोकळ-दिघे यांनी मात्र ग्रामीण रांगडेपणा बरोबरच अतिरंजितता, मनोरंजकता, काव्यमयता आणली. यावेळी ग्रामीण कथेचे वास्तवाशी असलेले नाते हळूहळू दुरावत गेले. घडवून आणलेल्या योगायोगांची गर्दी झाली. कथा रोमँटिक झाली. म.भा. भोसले यांनाही ग्रामीण जीवनाचा अनुभव होता. त्यांनी ग्रामीण तपशीलही भरले पण त्यात जिवंतपणा येऊ शकला नाही.

व्यंकटेश माडगूळकरांनी मात्र सर्वार्थाने ग्रामीण कथेला उच्च पातळीवर नेले. आशयसंपन्न, कसदार कथा लिहून समाजाचे सर्व अंगांनी

चित्रण केले. त्यांचे कथालेखन मराठीचे वैभवलेणे ठरले ते त्यांच्या वरील वाङ्‌मयीन जाणतेपणामुळेच. माणदेशी माणसाच्या शरीराबरोबर त्याच्या मनाचाही धांडोळा घेतला, आणि त्याच्या नियतीशरण दुःखाचे अनेक पदर उलगडून दाखविले. पुढे शंकर पाटलांनी जो मनोविश्लेषणाचा रंग अधिक गडद केला त्याची मुळे माडगूळकरांच्या लेखनात आहेत. शंकर पाटलांच्या कुटुंबकथांनी माणसाच्या मनाच्या ताण-तणावाचे चित्रण केले. ग्रामीण परिसर पार्श्वभूमीला ठेवून त्यातला माणूस अधिक ठळक केला. ग्रामीण "स्त्री" अधिक्याने, गांभीर्याने रंगविली. सामाजिकतेच्या दृष्टीने विचार करता त्यांनी समाजापेक्षाही व्यक्ती आणि त्याच्या मनाचा गुंता चित्रित केला. पाटीलही ख-या व्यापक अर्थाने सामाजिकतेला स्पर्श करु शकले नाहीत. उध्दव शेळके यांनी विदर्भातील दारिद्र्य चित्रित केले.

आनंद यादवांनी कथा अधिक काव्यमय केली. तिला स्व-गताचे रुप दिले. चिंतनशील केले. त्यांनी बोलीतून पूर्ण कथा लिहून एक वेगळा प्रयोग केला. पण कलात्मकतेचे फार भान ठेवण्याच्या नादात कथेतील आशयाला दुर्बलता येत गेली.

अशा प्रकारे निरनिराळ्या प्रदेशातील कथाकारांनी हा प्रवाह समृध्द केला. ग्रामीण समाजाला वाचकांसमोर ठेवले. रा.रं. बोराडे, सखा कलाल, चारुता सागर यांनी निष्ठेने हा प्रवाह वाहता ठेवलेला आहे. ग्रामीण बोलीतूनच कथा स्वाभाविक अंगाने प्रकट झाली. केवळ रुची पालटापेक्षाही जीवनदर्शन महत्त्वाचे ठरले. म.ना. अदवंतांनी म्हटले आहे की, "त्यांच्या कथातून आलेला आशय जिवंत व प्रत्ययकारी वाटू लागला. त्याची अभिव्यक्तीपण ग्रामीण भाषेतून होऊ लागल्यामुळे ग्रामीण कथांतून बोलीभाषेची विविध रुपे प्रकट होऊ लागली. भाषा समृध्द करण्याचे फार मोठे कार्य या ग्रामीण कथांनी केले."[२१]

## - संदर्भ -

१ पवार गो·मा· "ग्रामीण संवेदनशीलता", सकाळ (रविवार पुरवणी), पुणे, १ ऑगष्ट, १९८१·

२ यादव आनंद, "मराठी खेडे: जुने आणि नवे" ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १ मे, १९८१, पृष्ठ ३१-३२·

३ यादव आनंद, तत्रैव, पृष्ठ ३१-३२·

४ पवार गो·मा· "ग्रामीण संवेदनशीलता", सकाळ (रविवार पुरवणी), पुणे, १ आगष्ट, १९८१·

५ यादव आनंद, "अस्त की नव्या युगाकडे वाटचाल", ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ३०, प्रथमावृत्ती, १ मे, १९८१ पृ·६१·

६ यादव आनंद, "ग्रामीण साहित्य आणि शाहरी संस्कार", ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १ मे, १९८१, पृ· ३८

७ पवार गो·मा· "ग्रामीण संवेदनशीलता", सकाळ (रविवार पुरवणी), पुणे, १ ऑगष्ट, १९८१·

८ यादव आनंद, "भाषेच्या मर्यादा आणि विकासाच्या दिशा", ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १ मे, १९८१ पृष्ठ १०७·

९ संपादक, कुलकर्णी पंडित अनंत, यादव आनंद "ग्रामीण कथेचा स्वरूप विचार, मातीतले मोती, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे-३०, प्रथमआवृत्ती १९७०, पृष्ट ३.

१० तत्रैव तत्रैव, पृष्ठ ५.

११ यादव आनंद, "मराठी ग्रामीण कथेचा स्वरूप विचार", ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १ मे, १९८१, पृ.१५.

१२ तत्रैव, तत्रैव, पृष्ठ २९.

१३ विजया राजाध्यक्ष "गंगाधर गाडगीळांची मुलाखत", संवाद, ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, २ जून, १९८५, पृष्ठ १२०.

१४ यादव आनंद, "मराठी ग्रामीण कथेचा स्वरूप विचार" ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथम आवृत्ती १ मे, १९८१, पृ.१६.

१५ तत्रैव, पृष्ठ ३१.

१६ वडेर प्रल्हाद, "कथाकार व्यंकटेश माडगूळकर" अनुभव आणि आकार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, जुलै, ७९ पृष्ठ १२५.

१७ पवार गो.मा. "व्यंकटेश माडगूळकर एक अस्सल देशी माणूस", रविवार सकाळ, पुणे, ९ जानेवारी, १९८३.

१८ हातकणंगलेकर म.द., "ग्रामीण कथा", मराठी कथा रूप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन, पुणे, पृष्ठ ४२.

१९ तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ४३.

२० बांदिवडेकर चंद्रकांत, "कथा" <u>मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप</u> (१९५०-७५), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८६, पृष्ठ १४९.

२१ तत्रैव, तत्रैव पृष्ठ १५०.

२२ हातकणंगलेकर म.द. "ग्रामीण कथा", <u>मराठी कथा रूप आणि परिसर</u> सुपर्ण प्रकाशन, पुणे, पृष्ठ ४६.

२३ अदवंत म.ना. "कथा वाङ्‌मय", <u>प्रदक्षिणा</u>, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती, १९७६, पृष्ठ १८९.